# जागतिक महिला दिन

८ मार्च, हा जागतिक महिला दिन म्हणून सगळ्या देशभर साजरा केला जातोय. ह्या जागतिक महिला दिनाची पार्श्वभूमी अशी,

१९०७ साली स्टुटगार्ड येथे पहिली आंतरराष्ट्रीय समाजवादी महिला परिषद भरली. या परिषदेत 'क्लारा झेटकिन' या अतिशय लढाऊ बाण्याच्या, झुंजार कम्युनिस्ट कार्यकर्तीने सार्वत्रिक मतदानाचा हक्क मिळवण्यासाठी संघर्ष करणे हे समाजवादी स्त्रियांचे कर्तव्य आहे, अशी घोषणा केली.

८ मार्च १९०८ रोजी न्यूयॉर्कमध्ये वस्त्रोद्योगातील हजारो स्त्री-कामगारांनी रुटगर्स चौकात जमून प्रचंड मोठी ऐतिहासिक निदर्शने केली. दहा तासांचा दिवस आणि कामाच्या जागी सुरक्षितता ह्या मागण्या केल्या. या दोन मागण्यांबरोबरच लिंग, वर्ण, मालमत्ता आणि शैक्षणिक पार्श्वभूमीनिरपेक्ष सर्व प्रौढ स्त्री-पुरुषांना मतदानाचा हक्क मिळावा अशी मागणीही जोरकसपणे केली.

अमेरिकन कामगार स्त्रियांच्या या व्यापक कृतीने क्लारा झेटकिन अतिशय प्रभावित झाली.

१९१० साली कोपनहेगन येथे भरलेल्या दुसऱ्या आंतरराष्ट्नीय समाजवादी महिला परिषदेत, ८ मार्च १९०८ रोजी अमेरिकेतील स्त्री-कामगारांनी केलेल्या ऐतिहासिक कामगिरीच्या स्मरणार्थ, ८ मार्च हा`जागतिक महिला-दिन’ म्हणून स्वीकारावा असा जो ठराव क्लाराने मांडला, तो संमत झाला.

'महिला ' ही संज्ञा स्त्री जातीतील जी विविध रुपे आयुष्यात बघायला मिळतात त्या सर्व रूपांना लागू आहे.
स्त्री अगदी माता, बहीण, सहचारिणी, मैत्रीण, आजी, आत्या, मावशी, मामी इ रूपांनी नात्यात आणि समाजात तर मार्गदर्शक, शिक्षिका, mentor, colleague अश्या अनेक रुपांत भेटत असतात.

स्त्रीला परमेश्वराने खरं तर एका वेगळ्याच कणखरतेने बनवलंय. ती कुठल्याही रुपात भेटत असेल पण तिचा कणखरपणा, प्रेमळ स्वभाव, दयाळू वृत्ती हा खरा तर तिचा स्थायी भाव. तिच्यामध्ये काही चांगले आणि वाईट बदल घडत असतील त्याला प्रामुख्याने सभोवतालची माणसं, समाज आणि परिस्थिती जबाबदार असू शकते.

आईच्या रूपाने सगळ्यात प्रथम तिचे दर्शन होते. प्रेम, वात्सल्य, अपत्याबाबतचे प्रेम पण त्याच

सोबत करारीपणा. अपत्याच्या प्रेमापोटी प्रतिकूल परिस्थितीशी दोन हात करायची तयारी. हीच प्रेमळ माता त्या वात्सल्यापोटी 'हिरकणी' तर 'झाशीची राणी', ’जिजाऊ’च्या रुपात कणखर होते.

'बहीण' हे तर आईचे दुसरे रूपच. आपल्या भावाच्या सगळ्या खोड्या, चुका माफ करत असताना वेळ प्रसंगी खोटं बोलून बाजू सावरून घ्यायची पण तिची तयारी असते. त्या वेळी त्या बहिणीचे निर्व्याज प्रेम फक्त असते. ज्ञानेश्वर माऊली सारख्या थोर संतांच्या पाठीशी त्यांची लहान बहीण मुक्ताई आई सारखी उभी राहिली आणि प्रतिकूल परिस्थितीत कमालीची परिपक्वता दाखवत त्या भावंडाना साथ केली.

सहचारिणी किंवा पत्नी हे स्त्रीचे एक महत्वाचे महत्वाचे रूप. पुरुषाच्या सगळ्या चांगल्या वाईट प्रसंगांत धीरोदात्तपणे ही उभी असते. वपुंच्या भाषेत सांगायचे तर, "पत्नी ही पेपरवेट, त्या फडफडणाऱ्या पुरुषाला शांतपणे साथ करत तो उडू नये, भरकटूनये ह्याची काळजी घेत असते." पतीच्या स्वभावानुसार आपल्या स्वभावाला आणि आवडीला मुरड घालत, सासरच्या नातेवाईक आणि गोतावळ्यात जणू दुधात साखर विरघळते इतक्या सहजतेने त्या कुटुंबात समरस होते.

स्त्रीचे महत्वाचे रूप म्हणजे 'अन्नपूर्णा'. घरातील उपलब्ध साधनसमुग्रीचा वापर करत घरातील सदस्य आणि पाहुणे, आप्त आणि नातेवाईक ह्यांच्या खाण्या पिण्याच्या आवडीनिवडी जपत प्रत्येकाला खुश ठेवणे. वेळ पडली तर कोंड्याचा 'मांडा' करायची हातोटी तिच्या ठायी असते. हे पाककलेचे कौशल्य तिला 'सुगरण' ही पदवी बहाल करते.

तिच्या जीवनप्रवासात विविध भूमिका वठवताना, प्रत्येक भूमिकेला न्याय देण्याचा तिचा प्रामाणिक प्रयत्न असतो.

ह्या भूमिका पार पाडत असताना भले ती शिक्षणाने कमी असेल तरी शिक्षणाचा ध्यास बाळगताना ती 'सावित्रीबाई फुले' ह्यांच्या रुपात येते किंवा अशिक्षित असेल तर 'बहिणाबाईंच्या' रुपात जीवनाचे तत्वज्ञान सहज आणि सोप्या भाषेत मांडते. ती उच्च शिक्षित असेल तरी प्रसंगीं आपल्या जोडीदाराच्या स्वप्नपूर्तीसाठी मंदाकिनी आमटे किंवा साधनाताई आमटेंच्या रुपात त्या थोर व्यक्तींच्या जीवनाप्रवासात सावलीसारखी साथ सोबत करत असते.

सुधा मूर्थी च्या रूपात कणखरपणा दाखवत आजवर पुरुष प्रधान संस्कृतीतील असलेले job स्वतः मिळवण्यासाठी प्रसंगी रतन टाटा सारख्या उध्र्वयुना कंपनीच्या धोरणात बदल करण्यास भाग पडते आणि नंतर नारायण मूर्थी सारख्या साथीदाराच्या स्वप्नपूर्ती साठी स्वतःची career सोडून कणखर

पणे साथ देते आणि पुढे समाजसेवेचा वारसा पुढे सुरू ठेवते.

जेव्हा एक पुरुष शिकतो त्यावेळी तो सुशिक्षित होतो मात्र एक महिला शिकते त्यावेळी ती पूर्ण पिढी सुशिक्षित करते.

हीच स्त्री, महिला पुरुषांची मक्तेदारी तोडत सैन्य दलातील सर्वोच्चपदी विराजमान होण्याच्या ध्यासापायी, माधुरी कानिटकर ह्याच्या रूपाने आढळतात.

हीच महिला घराच्या जबाबदाऱ्या सांभाळत असताना घराची आर्थिक बाजू सांभाळण्यासाठी रिक्षा चालक, टॅक्सी चालक, बस कंडक्टर, बस ड्रायव्हर, पोलीस दल ह्या पारंपरिक पुरुष क्षेत्रांतील नोकरी मध्ये आढळतात.

तिचा कणखरपणा आणि नेतृत्व गुण इंदिराजीं, मार्गारेट थेचर, अंगेला मार्केल ह्या रूपात आढळतात. कॉर्पोरेट जगतात किरण मुजुमदार, अरुंधती भट्टाचार्य ह्यांच्या रूपात तर खेळ जगतात पी. व्ही. सिंधू,   सानिया मिर्झा, मेरी कोमच्या रूपात भेटत असतात.

लता दीदी, आशा भोसले, सुमन कल्याणपूर ह्यांच्या रूपात संगीत क्षेत्रात वावरताना आणि अभिनय क्षेत्रात माधुरी दीक्षित, काजोल, नूतन, तब्बू  इ. रूपांत संवेदनशील भूमिका वठवताना आढळतात.

हीच स्त्री, महिलाजगात विविध पदे पादाक्रांत करत घर आणि संसार ह्याचा समतोल अगदी योग्यपणे सांभाळतात.

'घार उडे आकाशी, तिचे लक्ष पिलापाशी' ह्या उक्तीप्रमाणे तिचे घर आणि संसारात तितकेच लक्ष असते.

ह्या स्त्रीच्या रूपाचे चपखल वर्णन करताना आचार्य अत्रे म्हणतात, 'स्त्री ही क्षणाची पत्नी आणि अनंतकाळाची माता आहे.'

ह्या स्त्रीला समजवून घेणे आवश्यक आहे, तिला निसर्गाने अफाट क्षमता बहाल केली आहे. त्यामुळे ज्याला ही स्त्री कळते तो पुरुषही परिपकव होतो.

"ज्याला स्त्री ‘आई’ म्हणून कळली, तो जिजाऊंचा ‘शिवबा’ झाला..

आणि ज्याला स्त्री 'बहीण' म्हणून कळली तो मुक्ताईचा 'ज्ञानदेव' झाला..
ज्याला स्त्री 'मैत्रीण' म्हणून कळली तो राधेचा 'शाम' झाला..
आणि ज्याला स्त्री 'पत्नी' म्हणून कळली तो सीतेचा 'राम' झाला.."

अश्या ह्या सात्विक आणि विद्या रूपातील सरस्वती, संपन्न रूपातील लक्ष्मी आणि वीर रूपातील दुर्गा इ. विविध पूज्य रूपात दिसणाऱ्या प्रत्येक महिलेला जागतिक महिला दिनानिमित्त हार्दिक शुभेच्छा.
💐💐

**- मनोज कुरुंभटी**